**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1783/2007.**

श्री नवल रजनीकांत त्रिवेदी
हॉटेल राजधानीच्या मागे,
सेंट्रल एव्हेन्यु, बजेरिया, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त, नागपूर महानगर पालिका,
नागपूर.

2) श्री चंद्रशेखर जाधव
जन माहिती अधिकारी तथा
प्रमुख अग्निशमन अधिकारी
महानगर पालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2006 रोजी जन माहिती अधिकारी महानगर पालिका ( अग्निशमन विभाग) यांचेकडे "That the Chief Fire Officer had made the communication no. 477 dated 12.7.06 to the police station Sadar regarding the tempered map submitted by hotel Rajdhani with an intention to obtain the NOC of below 14063 meters height. Thate after the same the P.I.Sadar had sent some communication to Fire Officer. That the fire officer had sent some communication to P.I.Sadar. That applicant want the copy of,

1. All the communications received from police station Sadar to Chief Fire Officer

2. All the communication sent from Chief Fire Officer to P.I.Sadar.

सदरची माहिती व्यक्तिशः by hand घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 3.3.2007 रोजी देण्यात आला असून माहिती संकलित करण्यास विलंब झालेला आहे. तथापी यापुढे माहिती अधिकारी यांनी ती सतर्क राहुन माहिती विहित मुदतीचे आत अर्जदारास पुरविण्याची दक्षता घ्यावी असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आले. अपीलकर्ता यांचे सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे ते स्वतः 30 दिवसाच्या आंत माहिती उपलब्ध करुन घेण्यास जन

माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते काय असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की प्रत्येक दर दोन दिवसाला ते जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यास जात होते. परंतु त्या मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही याबद्यलचा पुरावा मात्र त्यांनी दिला नाही. मात्र 30 दिवसानंतर दि. 15.9.2006 रोजी त्यांनी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. सदरच्या स्मरणपत्रामध्ये 30 दिवसाच्या आंत ते स्वतः माहिती घेण्यास गेले होते असे नमुद केलेले नाही. तरी त्यांना कोणत्याही प्रकारचे "no communication is received with above subjected application" असे त्यांनी म्हटलेले आहे. याचा अर्थ माहिती अधिकारी यांचेकडे माहिती स्वतः उपलब्ध करुन घेणार असे नमुद केलेले असून सुध्दा ते पत्राची वाट पाहात होते असे दिसून येते. असे असले तरी दि. 15.9.2006 रोजी सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर दिनांक 16.9.2006 रोजी सुध्दा त्यांनी स्मरणपत्र दिले आहे व माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारे स्मरणपत्रामध्ये त्यांनी दिलेले दिसून येते. मात्र दि. 27.9.2006 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस सुध्दा माहिती उपलब्ध नव्हती व निर्णय झाल्यानंतर दि. 8.12.2006 रोजी माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचेकडून कागदपत्रे दाखल करतांना त्यांना दि. 13.9.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या संबंधामध्ये दिलेल्या पत्राची छायांकित प्रत देण्यात आलेली आहे. परंतु सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.9.2006 रोजी तारीख असलेली दि. 8.12. 2006 रोजी देण्यात आली व दि. 13.9.2006 प्रमाणे स्विकारावी असे त्यांना सांगितले होते असे त्यांचे म्हणणे आहे. दि. 13.9.2006 रोजी जर अपूर्ण माहिती दिली असती तर त्यात 15.9.2006 चा उल्लेख आज असता. तसेच दि. 5.10.2006 च्या प्रथम अपील

मेमोमध्ये सुध्दा उल्लेख नाही यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती विलंबानेच दिलेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. सदरचा माहितीचा अर्ज दि. 5.8.2006 रोजी करण्यात आलेला आहे. त्यामुळे माहिती ही दि. 5.9.2006 च्या आत द्यावयास पाहिजे होती. ती दि. 8.12.2006 रोजी दिल्यामुळे 93 दिवस ही विलंबाने दिली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. आज विद्यमान जन माहिती अधिकारी हे सुनावणीस आले परंतु कोणत्याही प्रकारची माहिती ही त्यांनी घेतलेली दिसून येत नाही. कागदपत्रे दाखल केलेली आहेत परंतु वाचलेले दिसून येत नाही व अशा प्रकारे विद्यमान माहिती अधिकारी सुध्दा बेजबाबदार दिसून येतात. हयाबाबत आयुक्त महानगर पालिका यांनी योग्य ती कारवाई त्यांच्या कामकाजाबाबत करणे आवश्यक आहे जेणेकरुन अधिकारी जबाबदारी स्विकारण्यास तयार होतील.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.8.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.12.2006 रोजी म्हणजे एकुण 93 दिवसाच्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 23500/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी करावयाची असून त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करावी व तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगर पालिका नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 18.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.